# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते, की प्रा. अशोक बापू परीट यांनी " भावीण " व " महानंदा ", या कादंब–यांचा सामाजिक व वाङ्मयीनदृष्ट्या अभ्यास " या विषयावरील प्रबंधिकेचे संशोधनकार्य समाधानकारकरित्या पूर्ण केले आहे.

श्री. अशोक परीट यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररित्या ही प्रबंधिका लिहिली असून ती इतर कोणत्याही विद्यापीठातील कोणत्याही अन्य परीक्षेसाठी सादर केलेली नाही.

सदरची प्रबंधिका शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल ( मराठी ) पदवी परीक्षेसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

अर्जुननगर

दिनांक 23 जून, 1993

प्रा. डॉ. पी. व्ही. कुलकर्णी

मार्गदर्शक

प्रतिज्ञापत्र

" भावीण " व " महानंदा " या कादंब-यांचा सामाजिक व वाड्.मयीनदृष्टया अभ्यास " या विषयावरील सदरची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल.( मराठी ) पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे. ही प्रबंधिका अथवा तिचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

अर्जुननगर

दिनांक 23 जून, 1993

अशोक परीट

अभ्यासक

ऋणनिर्देश

कर्म आणि धर्माच्या वणव्यात होरपळणा–या – भाविणींच्या जीवनाचे दर्शन " भावीण " आणि " महानंदा " या दोन कादंब–यांतून घडले आहे. समाजातील एका उपेक्षित स्तरातील स्त्रिया म्हणजे " भाविणी " या देवदासी होत.

या स्त्रियांच्या जीवन चित्रणाचा अभ्यास वरील दोन कादंब–यांच्या आधारे करण्यास मी प्रवृत्त झालो ते शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. ल. रा नसिराबादकर यांच्यामुळेच । अधून मधून त्यांच्याशी झालेल्या चर्चेतून या पुस्तकांबद्दल माझ्या मनात कुतूहल निर्माण झाले. म्हणूनच एम्. फिल. च्या प्रबंधिकेसाठी त्यांचा अभ्यास करण्याचे मी निश्चित केले याची मनात जाणीव आहे.

सामाजिक संदर्भाचे मूल्य प्राप्त झालेल्या आणि मराठी साहित्यात दुर्लक्षित ठरलेल्या या दोन पुस्तकांचा मी माझ्या परीने अभ्यास सुरू केला. माझ्या या प्रबंधिकेचे चिकित्सक मार्गदर्शक प्रा.डॉ. पी. व्ही. कुलकर्णी यांच्या मौलिक मार्गदर्शनामुळे मला अभ्यासाची दिशा सापडत गेली. माझी उमेद वाढत गेली. त्यांच्यामुळेच आज ही प्रबंधिका मी सादर करू शकत आहे, हे मी विसरू शकत नाही.

माझी पत्नी सौ. सुनिता हिचा पाठपुरावा, सुहृद प्रा. आर.एन. कुलकर्णी, सौ. सुखदा पेठे, डॉ. सुहास सदानंद पेठे आणि " आनंदयात्री " तील माझ्या इतर सर्व मित्रांचे प्रोत्साहन, देवचंद कॉलेज मधील सर्व ग्रंथालय कर्मचा–यांनी केलेली मदत यांच्यामुळेच हे लेखन पूर्ण झाले.

देवचंद कॉलेजचे प्राचार्य एम.जे. कशाळीकर यांचे मार्गदर्शन, शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रपाठक प्रा.डॉ. विश्वनाथ शिंदे, व्याख्याते प्रा. शशिकांत शिंदे यांच्याशी अधूनमधून झालेली चर्चा या लेखनासाठी उपयुक्त ठरली.

या प्रबंधिकेचे सुबक टंकलेखन सौ. शोभना खिरे, क्वालिटी सायक्लोस्टायलिंग, सातारा यांनी परिश्रमाने पूर्ण केले याबद्दल त्यांचा व उपरोक्त सर्वांचा मी मनापासून आभारी आहे.

अशोक परीट